# "शैक्षणिक वर्ष 2010-2011 करिताचा विद्यापीठाचा बृहत आराखडा"

महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 च्या कलम 82 उपकलम (1) अन्वये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीतील उच्च व तंत्र शिक्षणाच्या सुविधा विचारात घेऊन जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील उच्च व तंत्र शिक्षण विषयक गरजांबाबत विचार करुन विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष 2010-2011 या एका वर्षाकरिताचा विकास आराखडा तयार केला आहे.

गेल्या काही वर्षात जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयीन शिक्षणाच्या सोयी-सुविधा व उच्च शिक्षण घेऊ इच्छिणा-या युवकांच्या गरजा व अपेक्षा यात मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. नवीन महाविद्यालये, अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र, संगणकशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र असे अभ्यासक्रम चालविणा-या महाविद्यालय व परिसंस्थांची संख्या वाढत आहे. तथापि, अजुनही ग्रामीण भागात ख-या अर्थाने उच्च शिक्षण पोहोचविणे शक्य झालेले नाही. राष्ट्रीय स्तरांवरील उच्च शिक्षण विषयक धोरणे मानव संसाधन मंत्रालयामार्फत प्रकाशित होत आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या बदलत्या धोरणांच्या अनुषंगाने आपल्यालाही विचार करणे आवश्यक आहे, असा विचार केला तरच उत्तर महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विषयीचे धोरण राष्ट्रीय स्तरावरील धोरणांशी मिळतेजुळते राहील व तीनही जिल्ह्यातील उच्च शिक्षण अधिक दर्जेदार, उपयोगी व येणा-या काळाशी मुकाबला करणारे ठरेल. या आराखड्याचे ठळक आधारभूत उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात अजुनही अशी काही निमशहरी केंद्र आहेत, की जेथे उच्च शिक्षणाच्या सोयी पोहोचविणे आवश्यक आहे. अशा ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा विचार करता तेथील युवकांना उच्च शिक्षण घेण्याकरिता अन्य गावी जाणे शक्य नसल्याने ग्रामीण भागात महाविद्यालयांची स्थापना व्हावी.
- जळगांव, धुळे व नंदुरबार ही जिल्ह्याची केंद्रे आता शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित होत आहेत. अन्य जिल्ह्यातून व प्रांतातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येण्याची प्रमाण वाढले आहे, म्हणून अशा जिल्ह्याच्या ठिकाणी विविध प्रकारच्या नवनवीन अभ्यासक्रमांच्या गरजा पूर्ण करणे.
- महिला शिक्षणाकरिता अधिक चालना मिळण्यासाठी मुलींची स्वतंत्र महाविद्यालये असावीत.
- मुलींसाठी होमसायन्स/ग्रामीण विकास (Rural Development) सारख्या अभ्यासक्रमांची सोय व्हावी.
- हॉटेल/हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, कॉम्प्युटर मॅनेजमेंट यासारख्या शिक्षणाची गरज सेवा क्षेत्रांच्या झपाट्याने होणा-या विकासामुळे निर्माण झाली असून त्या स्वरुपाच्या शैक्षणिक सुविधा त्वरीत निर्माण व्हाव्यात.
- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात काही अशी शहरे आहेत की, जेथे औद्योगिक व व्यावसायिक विकासाचे प्रमाण जास्त आहे व त्यामुळे दिवसा नोकरी/व्यवसाय करुन सायंकाळी शिक्षणाची अपेक्षा करणारे अनेक युवक/युवती आहेत. त्यांची गरज पूर्ण करण्याकरिता सायंकालीन महाविद्यालये निर्माण केली पाहिजेत.
- विद्यापीठाच्या मुख्य परिसरात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविणारे विविध शैक्षणिक विभाग आहेत. त्यात अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम, फार्म डी., एम.फार्मसी., एम.एस.डब्ल्यू. असे अभ्यासक्रम सुरु करणे आवश्यक आहेत.

- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्वत:ची घटक महाविद्यालये (Constitutent Colleges) असणे आवश्यक आहे. अशी महाविद्यालये प्रामुख्याने आदिवासी भागात सुरु करुन संगणकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, सुक्ष्मजीवशास्त्र, अर्थशास्त्र या व अशा स्वरुपाच्या कृषी व ग्रामीण विकासाशी संबंधित तसेच स्थानिक व्यावसायिक संधी व रोजगार मिळवण्याच्या क्षमता विकसित करण्यासाठी अभ्यासक्रम राबविणे आवश्यक आहे.
- विद्यापीठाच्या नंदुरबार उपकेंद्रात आभासी/वास्तविक वर्ग (Virtual Class room) निर्माण करुन आदिवासी विद्यार्थ्यांना जागतिक, राष्ट्रीय, प्रांतस्तरावरचे अद्यावत ज्ञान मिळण्याच्यादृष्टीने प्रयत्नांची गरज आहे.
- उमवि परिक्षेत्रात एम.ए. (नाट्यशास्त्र), एम.एफ.ए. हे अभ्यासक्रम सुरु करणेबाबत तरतूद करणे गरजेचे वाटते.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना मुलभूत व उपयोजित संशोधनाकरिता प्रवृत्त करण्यासाठी विद्यापीठ परिक्षेत्रात स्वतंत्र Institute of Research & Development ही निव्वळ संशोधन व विकासाकरिता वाहिलेली संस्था म्हणून या आराखड्यात समाविष्ठ करणे गरजेचे वाटते.
- प्रचलित/प्रस्तावित महाविद्यालयांनी कॉम्प्युटर, माहिती तंत्रज्ञान, मायक्रोबायोलॉजी, बायोटक्नॉलॉजी, बी.सी.ए., बी.बी.एम. (ई-कॉमर्स), एम.बी.एम. या व अशा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांची विद्यार्थ्यांची गरज ओळखावी व ती पूर्ण करण्याकरिता विद्यापीठाने अग्रक्रमाने विकास योजना तयार करावी.
- प्रचलित व प्रस्तावित महाविद्यालयांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमातील शैक्षणिक गुणवत्ता वर्धन करण्याच्यादृष्टीने विशेष प्रयत्न करावेत.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष 2010-11 ते 2014-15 करिता पंचवार्षिक विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु असून त्याबाबत व्यापक जनसंवाद व चर्चा आयोजित केल्या जाणार आहेत. तथापि, तात्कालिक व तातडीची बाब म्हणून शैक्षणिक वर्ष 2010-11 करिताचा विकास आराखडा तयार करण्यांत आला आहे.

सदर आराखड्यात नमूद केलेली स्थाननिश्चिती व अभ्यासक्रम विद्यापीठाशिवाय अन्य नियामक संस्था जसे, महाराष्ट्र शासन, ए.आय.सी.टी.ई., एन.सी.टी.ई. वगैरेंच्या धोरणास अधीन राहून करण्यांत आली आहे.

# नवीन महाविद्यालयांची स्थाननिश्चिती

शैक्षणिक वर्ष 2010-2011 या वर्षासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत आवश्यक असलेली विद्याशाखानिहाय नवीन महाविद्यालयांची स्थाननिश्चिती खालीलप्रमाणे दर्शविण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | तालुका | नियोजित महाविद्यालयासाठी निश्चिती केलेले स्थान | एकूण | शैक्षणिक वर्ष 2005-06 ते 2009-10 दरम्यान सुरु झालेली नवीन महाविद्यालये | शैक्षणिक वर्ष 2010-2011 करिता सुरु करता येणा-या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| **(1)** | **कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये** | | | | |
| **जळगांव जिल्हा (एकूण 41 महाविद्यालये)** | | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव शहर (03) पैकी (01) मुलींचे | 04 | 01 | 03 |
| | | असोदा | 01 | -- | 01 |
| | | भोकर (भादली) | 01 | -- | 01 |
| | | नशिराबाद | 01 | -- | 01 |
| | | म्हसावद | 01 | -- | 01 |
| 2 | अमळनेर | पातोंडा | 01 | -- | 01 |
| | | झाडी | 01 | -- | 01 |
| 3 | धरणगांव | पाळधी | 01 | -- | 01 |
| | | बांभोरी बु.॥ | 01 | -- | 01 |
| | | साळवा | 01 | -- | 01 |
| 4 | एरंडोल | कासोदा | 01 | -- | 01 |
| 5 | चोपडा | हातेड | 01 | -- | 01 |
| | | अडावद | 01 | -- | 01 |
| | | धानोरा | 01 | -- | 01 |
| | | घोडगांव | 01 | -- | 01 |
| 6 | चाळीसगांव | चाळीसगांव शहर | 01 | -- | 01 |
| | | मेहूणबारे | 01 | -- | 01 |
| | | कळमडू | 01 | -- | 01 |
| | | शिरसगांव | 01 | -- | 01 |
| | | उंबरखेड | 01 | -- | 01 |
| 7 | पाचोरा | पाचोरा शहर | 01 | -- | 01 |
| | | नगरदेवळा | 01 | -- | 01 |
| | | लोहारा | 01 | -- | 01 |
| 8 | भडगांव | कोळगांव | 01 | -- | 01 |
| | | कजगांव | 01 | -- | 01 |
| | | जुवार्डी | 01 | -- | 01 |

| अ.क्र. | तालुका | नियोजित महाविद्यालयासाठी निश्चिती केलेले स्थान | एकूण | शैक्षणिक वर्ष 2005-06 ते 2009-10 दरम्यान सुरु झालेली नवीन महाविद्यालये | शैक्षणिक वर्ष 2010-2011 करिता सुरु करता येणा-या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 9 | पारोळा | पारोळा शहर (मुलींचे) | 01 | -- | 01 |
| | | बहादरपूर | 01 | -- | 01 |
| | | मराठखेडा | 01 | -- | 01 |
| 10 | जामनेर | फत्तेपूर | 01 | -- | 01 |
| | | नेरी | 01 | -- | 01 |
| | | पहूर | 01 | -- | 01 |
| 11 | रावेर | चिनावल | 01 | -- | 01 |
| | | सावदा | 01 | -- | 01 |
| | | पाल | 01 | -- | 01 |
| 12 | यावल | किनगांव | 01 | -- | 01 |
| 13 | मुक्ताईनगर | अंतुर्ली | 01 | -- | 01 |
| | | कु-हा काकोडा | 01 | -- | 01 |
| 14 | भुसावळ | वरणगांव | 02 | 01 | 01 (वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेसाठी) |
| 15 | बोदवड | ------ | -- | -- | -- |
| **धुळे जिल्हा (एकूण 13 महाविद्यालये)** | | | | | |
| 1 | धुळे | धुळे शहर (03) | 03 | 01 | 02 |
| | | फागणे | 01 | -- | 01 |
| | | मुकटी | 01 | -- | 01 |
| | | बोरकुंड | 01 | -- | 01 |
| | | बोरीस | 01 | 01 | -- |
| | | शिरुड | 01 | -- | 01 |
| | | आर्वी | 01 | -- | 01 |
| 2 | शिरपूर | बोराडी | 01 | -- | 01 |
| | | अर्थे | 01 | -- | 01 |
| | | होळनांथा | 01 | -- | 01 |
| 3 | शिंदखेडा | बेटावद | 01 | -- | 01 |
| | | धमाणे/विरदेल | 01 | -- | 01 |
| 4 | साक्री | दुसाणे | 01 | -- | 01 |
| **नंदुरबार जिल्हा (एकूण 05 महाविद्यालये)** | | | | | |
| 1 | नंदुरबार | रनाळे | 01 | -- | 01 |
| | | नटावद | 01 | -- | 01 |
| 2 | नवापूर | नवागांव | 01 | -- | 01 |
| | | खांडबारा | 01 | 01 | -- |

| अ.क्र. | तालुका | नियोजित महाविद्यालयासाठी निश्चिती केलेले स्थान | एकूण | शैक्षणिक वर्ष 2005-06 ते 2009-10 दरम्यान सुरु झालेली नवीन महाविद्यालये | शैक्षणिक वर्ष 2010-2011 करिता सुरु करता येणा-या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 3 | शहादा | म्हसावद | 01 | 01 | -- |
| | | प्रकाशे | 01 | 01 | -- |
| | | मंदाणे | 01 | -- | 01 |
| 4 | तळोदा | बोरद | 01 | -- | 01 |
| 5 | अक्कलकुवा | ------ | -- | -- | -- |
| 6 | धडगांव | ------ | -- | -- | -- |
| **(2)** | **ललितकला महाविद्यालये (एकूण 05)** | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव | 01 | -- | 01 |
| | | जळगांव शहर (संगीत महाविद्यालय) | 01 | -- | 01 |
| 2 | चाळीसगांव | चाळीसगांव शहर | 01 | -- | 01 |
| 3 | धुळे | धुळे | 01 | -- | 01 |
| 4 | शिरपूर | शिरपूर | 01 | -- | 01 |
| **(3)** | **बी.एस्सी. (फॅशन डिझायनिंग) महाविद्यालये (एकूण 03)** | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव | 02 | 01 | 01 |
| 2 | धुळे | धुळे | 01 | -- | 01 |
| 3 | नंदुरबार | नंदुरबार | 01 | -- | 01 |
| **(4)** | **विधी महाविद्यालये (एकूण 05)** | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव (एलएल.एम.)- अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाकरिता | 01 | -- | 01 |
| 2 | भुसावळ | भुसावळ | 01 | -- | 01 |
| 3 | धुळे | धुळे (एलएल.बी.) | 01 | -- | 01 |
| | | धुळे (एलएल.एम.)- अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाकरिता | 01 | -- | 01 |
| 4 | शहादा | शहादा | 01 | -- | 01 |

| अ.क्र. | तालुका | नियोजित महाविद्यालयासाठी निश्चिती केलेले स्थान | एकूण | शैक्षणिक वर्ष 2005-06 ते 2009-10 दरम्यान सुरु झालेली नवीन महाविद्यालये | शैक्षणिक वर्ष 2010-2011 करिता सुरु करता येणा-या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| **(5) अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालये** (एकूण 17) (माहिती तंत्रज्ञान, एन्व्हॉयरॉर्नमेंट इंजिनिअरिरिंग, मेडिकल इंजिनिअरिंग, बायोमेडिकल इंजिनिअरिंग, ॲग्रो इंजिनिअरिंग, टेक्स्टाईल इंजिनिअरिंग, पेपर/पिंटींग टेक्नॉलॉजी, हॉटेल मॅनेजमेंट इत्यादि शाखांसह) | | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव शहर | 02 | -- | 02 |
| | | जळगांव जिल्ह्याकरिता | 07 | -- | 07 |
| 2 | धुळे | धुळे शहर | 01 | -- | 01 |
| | | धुळे जिल्ह्याकरिता | 03 | -- | 03 |
| 3 | नंदुरबार | नंदुरबार शहर | 01 | -- | 01 |
| | | नंदुरबार जिल्ह्याकरिता | 03 | -- | 03 |
| **(6) वास्तुशास्त्र महाविद्यालये** (एकूण 03) | | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव | 01 | -- | 01 |
| 2 | भुसावळ | भुसावळ | 01 | -- | 01 |
| 3 | धुळे | धुळे | 01 | -- | 01 |
| **(7) बी.एस्सी. (हॉटेल/हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट)** (एकूण 03) | | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव | 02 | 01 | 01 |
| 2 | धुळे | धुळे | 01 | -- | 01 |
| 3 | नंदुरबार | नंदुरबार | 01 | -- | 01 |
| **(8) फार्मसी महाविद्यालये** (एकूण 10) | | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव शहर | 01 | -- | 01 |
| | | जळगांव तालुका | 02 | 01 | 01 |
| 2 | धरणगांव | धरणगांव | 01 | -- | 01 |
| 3 | अमळनेर | अमळनेर | 02 | -- | 02 |
| 4 | भुसावळ | भुसावळ | 02 | 01 | 01 |
| 5 | मुक्ताईनगर | मुक्ताईनगर | 01 | -- | 01 |
| 6 | चाळीसगांव | चाळीसगांव | 01 | -- | 01 |
| 7 | शिंदखेडा | दोंडाईचा | 01 | -- | 01 |
| 8 | नवापूर | नवापूर | 01 | -- | 01 |

| अ.क्र. | तालुका | नियोजित महाविद्यालयासाठी निश्चिती केलेले स्थान | एकूण | शैक्षणिक वर्ष 2005-06 ते 2009-10 दरम्यान सुरु झालेली नवीन महाविद्यालये | शैक्षणिक वर्ष 2010-2011 करिता सुरु करता येणा-या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| **(9)** | **व्यवस्थापनशास्त्र/संगणक व्यवस्थापनशास्त्र परिसंस्था (एकूण 22)** | | | | |
| 1 | जळगांव | जळगांव | 03 | -- | 03 |
| 2 | भुसावळ | भुसावळ | 01 | -- | 01 |
| 3 | चाळीसगांव | चाळीसगांव | 01 | -- | 01 |
| 4 | चोपडा | चोपडा | 01 | -- | 01 |
| 5 | अमळनेर | अमळनेर | 01 | -- | 01 |
| 6 | धरणगांव | धरणगांव | 02 | 01 | 01 |
| 7 | जामनेर | जामनेर | 02 | 01 | 01 |
| 8 | मुक्ताईनगर | मुक्ताईनगर | 01 | -- | 01 |
| 9 | पाचोरा | पाचोरा | 01 | -- | 01 |
| 10 | रावेर | रावेर | 01 | -- | 01 |
| 11 | यावल | यावल | 01 | -- | 01 |
| 12 | धुळे | धुळे | 02 | -- | 02 |
| | | नगांव | 01 | -- | 01 |
| 13 | साक्री | साक्री | 01 | -- | 01 |
| 14 | नंदुरबार | नंदुरबार | 02 | -- | 02 |
| 15 | अक्कलकुवा | अक्कलकुवा | 01 | -- | 01 |
| 16 | नवापूर | नवापूर | 01 | -- | 01 |
| 17 | शहादा | शहादा | 01 | -- | 01 |

टीप:- P.G.D.B.M. ज्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थांमध्ये M.B.A. अभ्यासक्रम चालू नसेल, अशा महाविद्यालयांना/परिसंस्थांनासुध्दा मंजूर करण्यांत येईल.

| **घटक महाविद्यालये (Constituent Colleges) (एकूण 03)**<br>**(कृषी व ग्रामीण विकासाशी संबंधित)** | | | |
|---|---|---|---|
| 1 | जळगांव जिल्हा | चोपडा, जामनेर, यावल, रावेर या परिसरात. | 01 |
| 2 | धुळे जिल्हा | साक्री तालुका. | 01 |
| 3 | नंदुरबार जिल्हा | तळोदा, अक्कलकुवा, धडगांव, शहादा, नवापूर व नंदुरबार या परिसरात. | 01 |

| **विद्यापीठ उपकेंद्र** | |
|---|---|
| **विद्यापीठ परिसरात पुढील अभ्यासक्रमाचे उपकेंद्र सुरु करावे.** | |
| **A] स्कूल ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी (केमिकल टेक्नॉलॉजी वगळता)** | |
| 1) बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग | 01 |
| 2) मास्टर ऑफ इंजिनिअरिंग | 01 |
| B] फार्म.डी. | 01 |
| C] एम.फार्मसी. | 01 |
| D] एम.एस.डब्ल्यू. | 01 |

| **रात्रकालीन महाविद्यालये (कला व वाणिज्य विद्याशाखेसाठी) (एकूण 05)** | | | |
|---|---|---|---|
| 1 | जळगांव | जळगांव शहर | 01 |
| 2 | भुसावळ | भुसावळ | 01 |
| 3 | वरणगांव | वरणगांव | 01 |
| 4 | धुळे | धुळे शहर | 01 |
| 5 | नंदुरबार | नंदुरबार शहर | 01 |

| **ललितकला महाविद्यालयांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम (एकूण 01)**<br>1) एम.ए. (नाट्यशास्त्र)<br>2) एम.एफ.ए. (मास्टर ऑफ फाईन आर्ट्स) | | | |
|---|---|---|---|
| 1 | जळगांव | जळगांव शहर | 01 |

------- ✵✵✵✵✵✵ -------